23 SEP 2017
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणामधील व्यापारीकरण थांबवणे आवश्यक

## खा. संजय पाटील : राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत ५५ जणांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सध्या शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात व्यापारीकरण सुरू आहे. शिक्षणामधील व्यापारीकरण थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन खा. संजयकाका पाटील यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील नीलांबरी सभागृहामध्ये भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे आयोजित चौदाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत युवा संसद सदस्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.

खा. संजयकाका पाटील म्हणाले, खऱ्या अर्थाने सर्वसामान्य मुलांपर्यंत निःस्पृहपणे शिक्षण पोहोचविण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. संसदेमध्ये सामाजिक प्रश्न उपस्थित करताना प्रथम त्या विषयाची सखोल माहिती अभ्यासणे आवश्यक असते. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विधायक चर्चा होऊन विकासाचे नवे मार्ग खुले होतात.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी प्रथमतः इतरांचे ऐकण्याची कला अवगत केली पाहिजे. त्यामुळे हाती घेतलेले विधायक कार्य पूर्ण करण्यास गती प्राप्त होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत मार्गदर्शन करताना खा. संजयकाका पाटील. सोबत इतर.**

कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, समन्वयक प्रा. पवन शर्मा, संजय घोडावंत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. ए. रायकर, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. मनोहर वासवानी, आर. एस. पाटील, हर्षद ठाकूर, संतोष सुतार उपस्थित होते. स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांतील ५५ युवा संसद सदस्य सहभागी झाले होते. परदेशी पाहुणे म्हणून केनियाचे ब्रॅन रॉय, हेसला लुईस हे उपस्थित होते. यशवंत पुकळे, निखिता पिसे, नवीन राऊत, राजश्री गोसावी, हेरंब सावंत, रोहिणी अवताडे यांना विशेष संसद पुरस्कार मिळाला. भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.

23 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणातील व्यापारीकरण रोखा

## खासदार संजयकाका पाटील : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा

कोल्हापूर, ता. २२ : सामान्य मुलांपर्यंत निःस्वार्थीपणे शिक्षण पोचवण्याचे महान कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले, असे प्रतिपादन खासदार संजयकाका पाटील यांनी आज येथे केले. शिक्षणामधील व्यापारीकरण थांबविण्यासाठी युवकांनी जागरूक राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात चौदावी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा विद्यापीठ आणि संसदीय कामकाज मंत्रालयातर्फे झाली. त्या वेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के अध्यक्षस्थानी होते. वनस्पतीशास्त्र अधिविभागात निलांबरी सभागृहामध्ये संसद झाली.

श्री. पाटील म्हणाले, "कर्मवीरांनी केलेले शिक्षण विषयक कार्याचा जागर आपण घालायला हवा. सर्व सामान्यांच्या दारापर्यंत शिक्षण पोचवण्याचे काम त्यांनी केले. या शैक्षणिक कार्यामुळेच शिक्षणाची गंगोत्री दुर्गम वाड्या-वस्त्यांत पोचली आणि शिक्षणाने माणसाच्या जीवनाची दिशा बदलून गेली."



कोल्हापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात खासदार संजयकाका पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदी.

### यांना मिळाला विशेष संसद पुरस्कार

**युवा संसदमध्ये यशवंत पुकळे, निखिता पिसे, नवीन राऊत, राजश्री गोसावी, हेरंब सावंत, रोहिणी अवताडे यांना विशेष संसद पुरस्कार मिळाला. भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देवून विशेष गौरव करण्यात येणार आहे.**

संसदेमध्ये सामाजिक प्रश्न उपस्थित करताना प्रथम त्या विषयाची सखोल माहिती अभ्यासणे आवश्यक असते. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विधायक चर्चा होऊन विकासाचे नवे मार्ग खुले होतात, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यार्थ्यांनी प्रथमतः इतरांचे ऐकण्याची कला अवगत केली पाहिजे. त्यामुळे हाती घेतलेले विधायक कार्य पूर्ण करण्यास गती मिळते." कुलसचिव डॉ.व्ही. डी.नांदवडेकर, समन्वयक प्रा. पवन शर्मा, संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.ए.रायकर, डॉ.व्ही. वाय.धुपदाळे, डॉ.मनोहर वासवानी, आर.एस. पाटील, हर्षद ठाकूर, संतोष सुतार, केनियाचे ब्रॅन रॉय, हेसला लुईस उपस्थित होते. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ.आर.व्ही.गुरव यांनी आभार मानले.

23 SEP 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणामधील व्यापारीकरण थांबविणे आवश्यक

## खा. संजय पाटील; शिवाजी विद्यापीठात चौदावी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा

कोल्हापूर : प्रतिनिधी

सध्या सुरू असलेले शिक्षणामधील व्यापारीकरण थांबविणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन खासदार संजयकाका पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातील निलांबरी सभागृहामध्ये चौदावी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा विद्यापीठ आणि संसदीय कामकाज मंत्रालयातर्फे शुक्रवारी आयोजित करण्यात आली. यावेळी स्पर्धेतील सहभागी युवा संसद सदस्यांना मार्गदर्शन करताना खा. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शर्के होते.

खा. पाटील म्हणाले, सर्व सामान्य मुलांपर्यंत निस्पृहपणे शिक्षण पोहोचविण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. संसदेमध्ये सामाजिक प्रश्न उपस्थित करताना प्रथम त्या विषयाची सखोल माहिती अभ्यासणे आवश्यक असते. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विधायक चर्चा होऊन विकासाचे नवे मार्ग खुले होतात.

प्र-कुलगुरू डॉ.शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा इतरांचे ऐकण्याची कला अवगत केली पाहिजे. त्यामुळे हाती घेतलेले विधायक कार्य पूर्ण करण्यास गती प्राप्त होते.

यावेळी सहभागी विद्यार्थ्यांनी सर्जिकल स्ट्राईक, आतंकवाद, तोंडी तलाकबंदी, गोवंश हत्याबंदी, शेतकरी आत्महत्या, नोटाबंदी, जीएसटी तसेच सैनिकांच्या मृत्यूचे प्रमाण आदी विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा केली. विद्यार्थ्यांनी या विषयांवर अभ्यासपूर्ण आणि सडेतमोड मते मांडली.

यावेळी कुलसचिव डॉ.व्ही.डी. नांदवडेकर, समन्वयक प्रा.पवन शर्मा, संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.ए.रायकर, डॉ.व्ही.वाय. धुपदाळे, डॉ.मनोहर वासवानी, आर. एस. पाटील, हर्षद ठाकूर, संतोष सुतार उपस्थित होते. कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ.आर.व्ही. गुरव यांनी आभार मानले. स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांतील पंचावन्न युवा संसद सदस्य सहभागी झाले होते. परदेशी पाहुणे म्हणून केनियाचे ब्रँन रॉय, हेसला लुईस हे उपस्थित होते.

### सहा विद्यार्थ्यांना विशेष संसद पुरस्कार

स्पर्धेत सहभागी यशवंत पुकळे, निखिता पिसे, नवीन राऊत, राजश्री गोसावी, हेरंब सावंत, रोहिणी अवताडे या सहा विद्यार्थ्यांना विशेष संसद पुरस्कार मिळाला. भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.

## इचलकरंजीत एकाची आत्महत्या

इचलकरंजी : प्रतिनिधी

इचलकरंजी येथील वर्धमान चौक परिसरात राहणाऱ्या सुधाकर पांडुरंग संतफळे या विणकाम कामगाराने गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेची नोंद शिवाजीनगर पोलिस ठाण्यात झाली आहे. सुधाकर हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. काल रात्री ते आपल्या खोलीत झोपण्यासाठी गेले. तर त्यांची पत्नी सकाळी सुधाकर यांना उठवण्यासाठी गेल्या असता सुधाकर यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 SEP 2017
लोकमत

# विद्यापीठात कर्मवीरांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये शुक्रवारी त्यांना अभिवादन केले. मानव्यशास्त्र इमारतीसमोरील कर्मवीरांच्या पुतळ्यास प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. यावेळी खासदार संजयकाका पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, प्रा. पवन शर्मा, संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. व्ही. ए. रायकर, आदी उपस्थित होते.

23 SEP 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्याची गरज

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठात राष्ट्रीय युवा परिषदेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर, प्रतिनिधी**

पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पाण्याला पर्याय नाही. त्यामुळे सर्वांनीच पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू सिनेट सभागृहात शुक्रवारी पहिल्या तीन दिवसीय राष्ट्रीय युवा परिषदेचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भारतीय जलसांस्कृतिक मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. दत्ता देशकर होते.

कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जलसांस्कृतिक मंडळ, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट, महाराष्ट्र चाप्टर आणि विद्यापीठाचे डिपार्टमेंट


शिवाजी विद्यापीठातून

ऑफ टेक्नॉलॉजी (डीओटी) यांच्या वतीने करण्यात आले.

डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठ हे पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. विद्यापीठ परिसरात पडणारा पाऊस तलाव आणि विहिरींच्या माध्यमातून साठवला जातो. पाण्याच्या बाबतीत विद्यापीठाने नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण काम केले आहे. अध्यक्ष डॉ. देशकर म्हणाले, एक एकर परिसरात सरासरी ३० लाख लिटर पाऊस पडतो. पावसाचा प्रत्येक थेंब साठवला आणि वाचवला तर पाण्याचे दुर्भिक्ष कधीच कुणाला जाणवणार नाही. शिवाजी विद्यापीठाच्या विस्तीर्ण परिसरात पडणारा संपूर्ण पाऊस साठवला तर शहराला पाणीपुरवठा होऊ शकतो हे लक्षात घ्या. यासाठी पडणारा पाऊस साठवा आणि जिरवा. ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

यावेळी डीओटीचे संचालक डॉ. जयदीप बागी, पर्यावरण अधिविभागाचे डॉ. पी. डी. राऊत, आर्कि. सतीश माने आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अनिलराज जगदाळे आणि आभार सतीशराज जगदाळे यांनी मानले. रविवारी (दि. २४) परिषदेचा समारोप होणार आहे.

'23 SEP 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीतून घडले एकात्मतेचे दर्शन

## ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. अशोक चौसाळकर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ येथे व्याख्यानमालेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' ही तमाम मराठी भाषिकांनी जात, धर्म, पंथ, इत्यादी भेद विसरून लढवलेली चळवळ होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने सर्व मराठी भाषिक प्रथमच एकत्र आले. यातून एकात्मतेचे दर्शन घडले, असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. अशोक चौसाळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. अरुण भोसले होते.

इतिहास अधिविभाग आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने कै. प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात होते. या व्याख्यानमालेंतर्गत गुरूवारी 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ : स्वरूप व फलश्रुती' या विषयावर प्रा. चौसाळकर यांनी विचार मांडले. कार्यक्रमाची सुरूवात कै. प्रभाकरपंत कोरगावकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.




**कोल्हापूर : इतिहास अधिविभाग आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयक्त विद्यमानें आयोजित व्याख्यानात बोलताना प्रा. अशोक चौसाळकर. सोबत अन्य मान्यवर.**

ते म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' ही तमाम मराठी भाषिकांनी जात, धर्म, पंथ, इत्यादी भेद विसरून लढवलेली चळवळ होती. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी प्रामुख्याने शेकाप किंवा कम्युनिस्ट पक्षासारख्या डाव्या पक्षांनी मोठे योगदान दिलेले आहे. सेनापती बापट, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, नानासाहेब गोरे, प्रबोधनकार ठाकरे, एस. एम. जोशी यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनी अत्यंत संयमाने ही चळवळ हाताळली. त्यामुळे काही अपवाद वगळता यामध्ये फार मोठा हिंसाचार किंवा दंगे घडले नाहीत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेले लोक देखील मोठ्या संख्येने होते. शाहीर अमरशेख व अण्णाभाऊ साठे, गवाणकरांच्या कलापथकानेही या लढ्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली. संयुक्त महाराष्ट्र समितीची ताकद वाढविण्यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या शेड्यूल कास्ट फेडरेशनची फार महत्वाची भूमिका होती, असेही त्यांनी नमुद केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अरुण भोसले यांनी, महाराष्ट्र राज्य निर्मितीचे जितकें श्रेय संयुक्त महाराष्ट्र समितीने केलेल्या चळवळीचे आहे, तितकेच श्रेय यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणातील मुत्सदेगीरीला द्यावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले. व्याख्यानासाठी सामाजिकशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता प्रा. भारती पाटील, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. प्रकाश पवार, प्रा. रविंद्र भणगे, प्रा. शिवाजी जाधव, श्री. सुरेश शिपुरकर, डॉ. निलांबरी जगताप, प्रा. य. ना. कदम, इ. मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या संयोजनासाठी डॉ. किशोर खिलारे, उमेश भोसले, शरद पाटील यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी केले. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, आभार अविनाश भाले यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 SEP 2017
पुण्यनगरी

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीने मराठी भाषिक एकत्र

## – प्रा. अशोक चौसाळकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने सर्व मराठी भाषिक प्रथमच एकत्र आले, असे प्रतिपादन ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. अशोक चौसाळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभाग आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रभाकरपंत कोरगावकर स्मृती व्याख्यानमालेत 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ : स्वरूप व फलश्रुती' विषयावर ते बोलत होते. डॉ. अरुण भोसले अध्यक्षस्थानी होते.

प्रा. चौसाळकर म्हणाले, संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही तमाम मराठी भाषिकांनी जात, धर्म, पंथ आदी भेद विसरून लढवलेली चळवळ होती. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी प्रामुख्याने शेकाप किंवा कम्युनिस्ट पक्षासारख्या डाव्या पक्षांनी मोठे योगदान दिलेले आहे. सेनापती बापट, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, नानासाहेब गोरे, प्रबोधनकार ठाकरे, एस. एम. जोशी यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनी अत्यंत संयमाने ही चळवळ हाताळली. त्यामुळे काही अपवाद वगळता यामध्ये फार मोठा हिंसाचार किंवा दंगेधोपे घडले नाहीत.

इतिहास विभागप्रमुख व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी आभार मानले. व्याख्यानासाठी सामाजिकशास्त्रे विभागाच्या अधिष्ठाता प्रा. भारती पाटील, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. प्रकाश पवार, प्रा. रवींद्र भणगे, प्रा. शिवाजी जाधव, सुरेश शिपुरकर, डॉ. निलांबरी जगताप, प्रा. य. ना. कदम व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम संयोजनासाठी डॉ. किशोर खिलारे, उमेश भोसले, शरद पाटील यांनी परिश्रम घेतले.